सकाळ TODAY

## कॉलेज कट्टा

# निळशीमध्ये प्लॅस्टिक संकलन

**(इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल एज्युकेशन, आकुर्डी)**

पर्यावरण संवर्धन व स्वच्छतेबाबत जनजागृतीच्या उद्देशाने पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या आकुर्डीतील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्निकल एज्युकेशन, रिसर्च अँड मॅनेजमेंटमधील एमबीएच्या विद्यार्थ्यांनी अंदर मावळातील निळशी-खांड परिसरात प्लॅस्टिक संकलन उपक्रम राबवला. जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात श्रमदान केले. प्लॅस्टिकचा वापर कमी करण्याचे आवाहन करत स्वच्छ व पर्यावरणपूरक परिसर राखण्याचा संदेश दिला. संचालक डॉ. संतोष खलाटे यांचे मार्गदर्शन लाभले. ग्रीन क्लब समन्वयक प्रा. शारदा पालव, प्रा. पूजा प्रजापती, प्रा. कविता चव्हाण, प्रा. साई श्रवणकुमार रेड्डी, सुमीत जगदाळे व रामभाऊ मोरमारे यांनी सहभाग घेतला. सरपंच कुंडलिक निसाळ, ग्रामस्थ संतोष कांबळे, रामदास घुडे व कुलदीप कांबळे यांनी सहकार्य केले.